# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १६/०२/२०२५ (रविवार)**

---

## पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत ,कोतवाल बर्डी, एशियन फायर वर्क कंपनी येथे झालेल्या स्फोटा बाबत...

**पोलीस स्टेशन कळमेश्वर :—** दिनांक १६/०२/२०२५ रोजी १४:१३ वाजता पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे डायल ११२ वर कॉल आला की, एशीयन फायरवर्क कंपनी, कोतवाल बर्डी येथे स्फोट झाला आहे. अशी माहीती प्राप्त होताच कळमेश्वर पोलीस तात्काळ घटनास्थळी रवाना झाले. घटनास्थळी फायरबिग्रेड, ॲम्बुलन्स, बी.डी.डी.एस पथक, एसटीएस, फॉरेन्सीक टीमला बोलाविण्यात आले. पोलीसांनी घटनास्थळाची पाहणी केली असता १).मुनीप कुमार मरावी, वय ३७ वर्षे, रा. मंडला, मध्यप्रदेश २).भुरा रज्जाक ,वय २५ वर्षे, रा. भिलमा ता. लखनादौड, राज्य मध्यप्रदेश हे मृत अवस्थेत जळालेले दिसले. व इतर कामगार १) सौरभ सुरेश मुसळे, वय २५ वर्षे, रा. डोरली भिंगारे,ता कळमेश्वर हा किरकोळ जखमी असल्याने त्याला उपचाराकामी ग्रामीण रुग्णालय, कळमेश्वर येथे पाठविण्यात आले तसेच २) घनशाम सिताराम लोखंडे, वय ४७ वर्षे, रा. डोरली भिंगारे ता कळमेश्वर ३) सोहेल दिलदार शेख, वय २४ वर्षे, रा. राउळगाव ता कळमेश्व यांना सदर घटनेत पायाला फ्रॅक्चर झाल्याचे दिसल्याने त्यांना उपचाराकामी घाटे हॉस्पीटल, काटोल येथे पाठविण्यात आले आहे. तसेच मृतदेहांचा मरणोत्तर पंचनामा करुन दोन्ही मृतदेह उत्तरीय तपासणी करिता मेडीकल कॉलेज नागपुर येथे रवाना करण्यात आले आहे.एशीयन फायर वर्क कंपनी, कोतवाल बर्डी येथे प्रॉडक्शन डिर्पाटमेटमध्ये काम करणारे सुपरवायजर मुस्तफा सफौउददीन शेगाववाला यांना घटनेसंबंधात विचारपुस केली असता त्यांनी सांगितले की, आज दिनांक १६/०२/२०२५ रोजी कंपनीमध्ये कामगार काम करीत असता दुपारी अंदाजे ०१/५५ वा. अचानक कंपनीचे प्रोडक्शन खोलीमधुन जोराचा स्फोट झाल्याचा आवाज आला.

सदर घटनास्थळी मा.श्री हर्ष ए. पोद्दार पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री रमेश धुमाळ, अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण, श्री अनिल मस्के, उपविभागिय पोलीस अधिकारी,सावनेर तथाा सहा पोलीस अधिक्षक यांनी घटनास्थळाला भेट देवुन घटनास्थळाची पाहणी केली. तसेच सहा.आयुक्त कामगार, उपविभागिय दंडाधिकारी काटोल, Directorate of Industrial Safety and Health (DISH) चे अधिकारी, यांनी सुध्दा भेट दिली आहे. सदर घटनास्थळावर नागपुर ग्रामीण जिल्हयातील नविन फॉरेन्सीक व्हॅन द्वारे फॉरेन्सीक पुरावे गोळा केले

जात आहे.तसेच सायबर पोलीस स्टेशन नागपुर ग्रमीण चे पथक घटनास्थळावरील फुटेज प्राप्त करण्यासाठी घटनास्थळावर हजर आहेत.बि.डी.डी.एस पथकाने सुध्दा संपुर्ण घटनास्थळाची पाहणी केली आहे. घटनास्थळावरील बाकी असलेले स्फोटक पादर्थ(एक्सप्लोसिव्ह) हे एक्सप्लोसिव्ह व्हॅन मध्ये सुरक्षीत रित्या ठेवण्यात आलेले आहे. . उदया Petroleum and Explosive Safety Organisation (PESO) चे अधिकारी घटनास्थळाला भेट देणार आहेत.

प्रथमदर्शी सदर स्पोट कंपनीमध्ये असलेल्या स्फोटकाच्या बाबतीत हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्यामुळे झालेला आहे असे दिसते . सदर प्रकरणी अज्ञात इसमाविरुदध कलम १०६(१), २८८ ,१२५(बी) भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

## जबरी चोरी चा गुन्हा उघड

दिनांक १४.०२.२०२५ रोजी फिर्यादी अशोककुमार प्रितम शर्मा, वय ४२ वर्षे,रा हासई, ता. बाडी जि धवलपुर, राज्य राजस्थान ,ह.मु. खरबी रोड,गाडगेनगर नागपुर.यांनी पोलीस स्टेशन बोरी येथे रिपोर्ट दिली की, दिनांक १२/०२/२०२५ रोजी रात्री १०:०० वाजेच्या सुमारास फिर्यादी हे हिंगणघाट, जि वर्धा येथुन मोटर सायकल ने चंद्रपुर नागपुर हायवे ने नागपुर येथे परत येत असतांना मौजा बोरखेडी टोलनाक्या च्या जवळ दोन विनानंबर प्लेट च्या मोटर सायकने ४ अज्ञात आरोपी येवुन फिर्यादीला त्याच्या मोटर सायकल वरून उतरवुन फिर्यादीला धमकावुन त्यांच्या ताब्यातुन फिर्यादीची हिरो कंपनीची स्टर्नर मोटर सायकल क्र एम एच ४० ए ई ७४३९,फिर्यादीचा सॅमसंग कंपनीचा ॲड्राईड वापरता मोबाईल,आणि रोख ५०,००० रूपये आणि फिर्यादीचे पर्स असा एकुण ६५,०००/— रूपयाचा ऐवज जबरीने चोरून नेला.अशा फिर्यादीच्या रिपोर्ट वरून पोलीस ठाणे बोरी येथे कलम ३०९(४) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद आहे.

बोरी पोलसांनी तात्काळ सदर गुन्हयाचा तपास सुरू केला तसेच स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांनी सुध्दा समांतर तपास सुरू केला असतांना सदर गुन्हयाचा तांत्रिक पध्दतीने तपास करीत फिर्यादीस विश्वासात घेउन गुह्याबाबत सखोल विचारपुस केली असता. सदर फिर्यादी यांच्या सोबत जबरी चोरी चा कोणताही प्रकार घडला नसुन त्यांनी जबरी चोरीबाबत खोटी रिपोर्ट दिली होती अशी माहीती प्राप्त झाली. फिर्यादीच्या ताब्यातुन हिरो

कंपनीची स्टर्नर मोटर सायकल क्र एम एच ४० ए ई ७४३९,फिर्यादीचा सॅमसंग  कंपनीचा अॅड्राईड  मोबाईल जप्त करण्यात आले आहे.सदर मुददेमाल बोरी पोलस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आला आहे. पुढील कायेदशीर कारवाई बोरी पोलीस करीत आहे.



## संशयीत रित्या गुन्हा करण्याच्या उद्देशाने अस्तिव लपवुन फिरणाऱ्या दोन इसमांविरूध्द कारवाई

**पोलीस स्टेशन बोरी** – दिनांक १५/०२/२०२५ रोजी बोरी  पोलीस रात्रगस्त करीत असतांना मौजा एच.बी.एल. टॉवर जवळ, बुटीबोरी, ता. जि नागपुर येथे संशयीत ईसम नामे अजिंक्य मोरेश्वर काकडे, वय २५ वर्ष रा. गंगा माता मंदिर प्लॉट नं १३२ नागपुर आणि विनोद रामकृष्ण गोबाडे वय ३९ वर्ष रा. मुजीप पठाण याचे घराजवळ ,बोरी असे  **संशयीत रित्या  सुर्यास्त ते सुर्योदय दरम्यान गुन्हा करण्याच्या उद्देशाने अस्तिव लपवुन फिरतांना मिळुन आले. सदर**

**आरोपीतांविरूध्द** बोरी पोलीस स्टेशन येथे कलम १२२ महाराष्ट्र पोलीस कायदया अन्वये गुन्हे नोंद आहे.

## अकस्मात मृत्यु

**पोलीस स्टेशन काटोल** :— दिनांक **१५/०२/२०२५ रोजी** १८:०० वाजेच्या दरम्यान मृतक नामे कुणाल अशोक मोहरिया, वय २६ वर्ष, रा. पानवाडी ता. काटोल याचे **घरी टाईल्स लावण्याचे काम सुरू असल्याने मृतक हा प्लगमध्ये खुले वायर टाकण्याकरिता गेला असता त्याला कंरट लागल्याने बेशुध्द होवुन पडल्याने त्याला प्रथम उपचाराकामी ग्रा.रू. काटोल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले.** फिर्यादी नामे रविन्द्र भैयालाल मोहरीया वय ४० वर्ष रा पानवाडी ता. काटोल यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन काटोल येथे मर्ग नोंद आहे.

पोलीस माहीती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर